Chapter-8



प्रकरण ८ वें.

# उपसंहार

## १ विहंगमावलोकन

आता या ठिकाणीं आत्मचरित्राचें आता पर्यंत जें अवलोकन आपण केलें त्याचें समालोचन करावयाचें आहे. आधुनिक आत्मचरित्राचें संपूर्ण चित्र वाचकापुढे ठेवावें आणि त्यावरून कोणकोणते सामान्य आणि सूक्ष्म सिद्धान्त आपणाला दिसतात हें पाहावें हेंच या प्रबंधाचें उद्दिष्ट होतें. म्हणूनच आपण प्रथम चरित्र आणि आत्मचरित्र यातील फरक पाहिला. नंतर आत्मचरित्राचा हेतु कोणता या विषयी आत्मचरित्रकारांचेंच म्हणणें प्रथम पाहून त्यावरून व्यक्त होणारे उत्कृष्ट आत्मचरित्राचे सिद्धान्त ठरविले. कारण त्याशिवाय आदर्श आत्मचरित्रांत कोणकोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे आणि कोणकोणत्या गोष्टींची नाही या विषयीं सांगोपांग चर्चा आपणास करता आली नसती.

हें केल्यावर आधुनिक आत्मचरित्रांच्यापैकी काहींची ओळख करून घेण्यापूर्वी प्राचीन वाङ्मयातून कोणकोणते आत्मचरित्रपर उल्लेख आढळतात, याचें विहंगमावलोकन आपण केलें. कारण तसें करणें आवश्यक होतें. प्राचीन वाङ्मयातूनच आधुनिक वाङ्मयाचा ओघ प्रसरण पावल्यामुळे तिकडे आपलें लक्ष जाणें अगदी स्वाभाविक असेंच होतें.

नंतर आपण आधुनिक आत्मचरित्रांची ओळख करून घेतली. अर्थात् ती त्रोटक अशी आहे. परंतु तेवढ्यावरूनही जर वाचकांची जिज्ञासा जागृत होऊन अमुक एक आत्मचरित्र संपूर्ण वाचावें असें त्यांना वाटू लागलें तर या संक्षिप्त वृत्तांताचा उपयोग मोलाचा झाला असें म्हणायला हरकत नाही.

या नंतर आत्मचरित्रांतून घडणारें समाजदर्शन आपण पाहिलें. कारण त्यावरून राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक इत्यादि अनेक प्रकारची मनोरंजक नि उपयुक्त अशी माहिती आपणास मिळाली. त्या माहितीच्या आधारें समाजाचें त्या वेळचें चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहण्याला मदत झाली. तसेंच चालू काळांत कोणकोणत्या सुधारणा व्हायला पाहिजेत की ज्यामुळे समाजाला अधिकाधिक उज्ज्वल स्वरूप प्राप्त होईल याचा अदमासही आपण घेतला. पण तो अधिक स्पष्ट आणि सांगोपांग असा त्या ठिकाणी आपणास घेता आला नाही. तो आपण या प्रकरणांत घेऊं.

या नंतर पुढील प्रकरणांत 'देव आणि दैव' या विषयी आत्मचरित्रकारांचे विचार आपण ऐकून घेतले. खरोखर देव आणि दैव हा विषयच मुळी असा आहे की जगाच्या सुरुवातीपासून तो आता पर्यंत आणि भविष्यकाळातही या विषयी जिज्ञासु आणि ज्ञानी लोक विचार करतील यांत शंका नाही. कारण संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम आणि समर्थ रामदास यांच्यासारखे साधुपुरुष जसे पूर्वी झाले तसे पुढेही होतील आणि समाजाला सत्याच्या सन्मुख नेऊन खऱ्या सुखाचा अनुभव मिळवून देतील यांत शंका नाही. हें जसें खरें आहे तसेंच पूर्वी चार्वाक सारख्या

विव्दानांनी नास्तिक म्हणून नाव मिळविले तसे पुढेही कोणी 'चार्वाक' होणार नाहीत असेही म्हणता येणार नाही.

या नंतर पुढील प्रकरणात 'आत्मचरित्रकारांच्या अनुभवाचें सार' आपण पाहिलें. त्याबद्दल विशेष बोलायला नको. बाजारात अगदी उघड्यावर विकायला म्हणून ठेवलेल्या गुलाब मोगरा इत्यादि सुगंधित फुलांच्या गुच्छांपैकी कोणता विकत घ्यायचा, त्याला घरीं आणून आपल्या आवडत्या देवताच्या चरणीं वाहून घरातील शोभा कशी वाढवायची आणि आपल्या अंतःकरणाला क्षणभर का होईना पण पावन करून पेऊन सत्कृत्य करण्यासाठी स्फूर्ति मिळवून प्रत्यक्ष कृति करण्यासाठी उद्युक्त कसें व्हायचें हें ज्याने त्याने ठरवायचें आहे. कारण सगळ्याच गोष्टी आपल्यासमोर स्पष्ट असल्या तरी त्यांच्याकडे पाहण्याची आपली भावना निर्मळ असल्याशिवाय आपणास व्हावा तेवढा फायदा होऊ शकणार नाही, हें सूर्य प्रकाशा इतकें स्पष्ट आहे.

मराठीतील आत्मचरित्रांच्या प्रमाणेंच अन्य भाषांतील आत्मचरित्रांच्याकडे आपण दुर्लक्ष केलें नाही. भारतातील सर्व भाषांतील आत्मचरित्रांची थोडीफार तरी ओळख करून देणें हें अवघड असें कार्य आहे. यास्तव याबाबत अधिक खोलांत न शिरता काही भाषेतील काही आत्मचरित्रांची यादी सोबत देण्यात आली आहे. त्या यादीवरून एखाद्या जिज्ञासूस अधिक माहिती मिळवावी असें वाटलें तर त्याची थोडी सोय होऊ शकेल. त्यातल्या त्यात मूळचे गुजराती भाषेत लिहिलेलें महात्मा मोहनदास करमचंद गांधी यांच्या आत्मचरित्राचा येथे मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो.

जसें मराठींत लक्ष्मीबाई टिळक यांची 'स्मृतिचित्रें' हें आत्मचरित्र उत्कृष्ट आहे तसेंच गुजरातींत महात्मा गांधींचें 'सत्यना प्रयोगो' हें आत्मचरित्र उत्कृष्ट आहे. म्हणूनच या आत्मचरित्रांची जगातील अक्षर वाङ्मयात गणना होईल यांत शंका नाही. याच कारणास्तव महात्मा गांधी यांच्या आत्मचरित्राची या प्रबंधात ओझरती ओळख करून दिली आहे.

## २ अज्ञानाचे दुष्परिणाम

आता या आत्मचरित्रांच्या अवलोकनातून जे विचार वेळोवेळी आपणाला आढळले त्यांना येथे आपणासमोर क्रमाक्रमाने मांडतो. आत्मचरित्रांच्या अध्ययनावरून ठळकपणें स्पष्ट होणारा पहिला मुद्दा असा की अज्ञान हें फार भयंकर आहे. अज्ञानामुळें मनुष्य दैववादी बनतो. बाबा पदमनजी यांच्या बालपणी अनेक देवदेवतांचें प्राबल्य कसें होतें, त्यासाठी लोक आपला पैसा आणि वेळ कसा घालवीत होते आणि दैववादामुळे कसे हतबल झाले होते हें दिसून येतें. आज शंभर वर्षांनंतरही बाबा पदमनजींच्या बालपणी त्यांना जसा अनुभव येत होता तसाच अनुभव आम्हीं घेणारे लाखो लोक आहेत. त्यामुळे आपल्या देशाची प्रगती जेवढी व्हायला पाहिजे तेवढी होऊं शकत नाहीं. कारण आपण प्रयत्नवादावर जोर दिला पाहिजे असा विचार अज्ञानी लोकांच्या मनांत येत नाही. उलट व्यसनांच्या आहारी जाणें; ज्यांच्या ज्यांच्याशी संबंध येतो त्यांच्या त्यांच्याशी भांडण्यात फुशारकी मारणें, आणि आपणावर अवलंबून असणारांची हेळसांड करणें यातच असा मनुष्य आपली उभी हयात घालवितो .

आणि यातच आपण कृतकृत्य झालों असी भावना वाळगतो.

दादोबा पांडुरंग, धर्मानंद कोसंबी, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे आणि जनरल नानासाहेब गणपतराव शिंदे या आत्मचरित्रकारांनी या विषयी फार सखोल ऊहापोह केला आहे. खरें शिक्षण माणसाच्या मनात सुसंस्काराचें बीज पेरतें. त्या शिवाय अमुक एक वाईट गोष्ट करूं नये तर कां करूं नये आणि अमुक एक चांगली गोष्ट आहे तर ती कां चांगली आहे हें असा माणसाच्या लौकर लक्षात येणार नाही. आणि जोवर अनेक व्यक्तींच्या मनांत असा सदविचार फोफावणार नाही तोवर समाजाची उन्नती होईल असें मानणें मृगजळाच्या मागें लागण्यासारखें आहे. आज प्रगतीच्या शिखरावर जीं राष्ट्रें आहेत तेथे शिक्षणाचा प्रसार आणि सर्व साधनांनी युक्त अशा शिक्षणाची संधी सर्वांना उपलब्ध झालेली आहे.

परंतु गेल्या पाऊणशें वर्षांत शिक्षणाच्या बाबतींत आपल्या देशाची जेवढी प्रगति व्हायला हवी होती तेवढी झालेली नाही. पाऊणशें ऐंशी वर्षांपूर्वी महात्मा ज्योतिबा फुले यांनी उच्चारलेले उद्‌गार आज्ही किती खरे आहेत ते पाहा. ड्यूक ऑफ कॅनॉट यांचा स्वागत समारंभ भरला असतांना ज्योतिबा मुद्दाम एका शेतकऱ्याच्या पोषाखात तेथे गेले. तेव्हा तेथे संवाद झाला तो असा .. ज्योतिबा .. "महाराज ! मी थोडेसे दोनचार शब्द बोलू का ?"

कॅनॉट .... "हे कोण आहेत ?"

चिपळूणकर .... हे श्री. फुले आहेत. रंजल्या गांजलेल्यांच्या बद्दल यांना फार आपुलकी वाटते."

क्रॉट .. " तर मग आपण बोला. "

ज्योतिबा .. " येथे उत्तमोत्तम पोषाख करून जे लोक आलेले आहेत त्यांच्याकडे पाहून, आपणास हिंदुस्थानच्या लोकांची खरी कल्पना येणार नाही म्हणून मी मुद्दाम शेतकऱ्याच्या पोषाखात आलों आहे. मी ज्या प्रमाणें फाटकीं वस्त्रें घातली आहेत तशींच फाटकीं वस्त्रें या देशातल्या हजारो नव्हे लाखो लोकांना घालावी लागतात. इतकी हिंदुस्थानातील शेतकऱ्यांची गरीबीची स्थिती आहे. म्हणूनच महाराज ! आपणास माझी अशी विनंती आहे की आपण क्वीन व्हिक्टोरियाला म्हणजे आपल्या पूज्य आईला येथील गरीब जनतेचा असा निरोप द्या की येथील जनतेचा उद्धार शिक्षणाने, केवळ शिक्षणाने आणि शिक्षणानेंच होणें शक्य आहे. "

हें ज्योतिबाचे उदगार आजही खरें नाहीत काय? आपल्या देशातली आजही ऐंशी टक्के जनता अजून अशिक्षित आहे. अशावेळी शिक्षणाचें महत्व किती आहे तें त्यांना कळणार तरी कसें ? महात्मा फुले यांना द्रष्टे म्हणतात ते एवढ्या साठीच. कारण ज्याला शिक्षणाचा गंधही नाहीं अशा माणसांत विचारांची जागृती होणार तरी कशी ?

यास्तव समाजांत राजकीय, सामाजिक, धार्मिक, आणि इतर सर्व प्रकारची नवविचारांची पेरणी होऊन समाजाची प्रगति व्हावी अशी इच्छा बाळगणारांनी अज्ञानरूपी राक्षसाला प्रथम नाहीसें केलें पाहिजे. एवढे शिक्षण हेंच असें क्षेत्र आहे की जोंवर या बाबतींत कांही उपाययोजना आपण करणार नाही तोंवर .

समाजाची प्रगति होणार नाही. आता एवढें मात्र खरें की शिक्षणाने मनुष्य सुसंस्कृत बनला पाहिजे. तो पढतमूर्ख बनू नये. म्हणजे अज्ञान हें जसें फारच घातुक तसेंच पढतमूर्ख बनविणारें शिक्षणही त्याज्यच म्हटलें पाहिजे. उलट चांगल्या शिक्षणाने .. मनुष्याच्या मनात संयम आणि सदविचार यांची प्रेरणा होते आणि ती मनुष्याच्या हातून आपोआपच सत्कृत्य घडविते. सांगायचा मुद्दा असा की शिक्षणाने मनुष्य .. सुसंस्कृत बनला पाहिजे आणि तसा जर तो बनत नसेल तर आपलें काहीतरी चुकलें आहे हें ओळखलें पाहिजे आणि त्याप्रमाणें शिक्षणात सुधारणा घडवून आणली पाहिजे.

शिक्षणाची संधी न मिळाल्यामुळे आणि कोणीही प्रोत्साहन न दिल्यामुळे समाजातल्या कितीतरी व्यक्तींचें जीवन अज्ञानात, अडचणींत आणि अगणित अशा भोळ्या समजुतींना कवटाळण्यात जात आहे. या व्यक्तींना शिक्षणाची संधी मिळाली असती तर त्यांनी स्वतःची प्रगती आणि समाजाची प्रगती घडवून आणण्यात खात्रीने हातभार लावला असता. शिक्षणाची संधी मिळाल्याबरोबर अस्पृश्य समाजातूनच डॉ.आंबेडकर यांच्यासारखे थोर विचारवंत आणि दुष्टे कार्यकर्ते पुरुष जन्माला आलेत की नाही! मग शिक्षण मिळालें तर आणखी कितीतरी 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर' जन्माला येऊ शकणार नाहीत का? या गोष्टीचा आपण सर्वांनी फार खोल विचार करायला पाहिजे. शिक्षण नाही, प्रोत्साहन नाही आणि सामाजिक आणि स्थिती योग्य नसल्यामुळे आपल्या देशाचें केवढे तरी नुकसान होत आहे. यासाठी तरी समाजातल्या सर्व सुशिक्षित बंधुभगिनींनी अज्ञानरूपी अंधकाराला घालवून देण्यासाठी कंबर बांधली पाहिजे आणि शिक्षणप्रसाराला अंतःकरणापासून वाहून घेतलें पाहिजे.

## १ कार्यकर्त्यांची परंपरा.

स्वातंत्र्यानंतर केंद्रीय आणि प्रांतीय सरकार शिक्षण प्रसार व्हावा म्हणून प्रयत्न करीत आहे. वारे माप पैसा खर्च होत आहे. परंतु ज्यांच्या हातात या योजना व पैसा आहे अशा खालपासून तर वरपर्यंत सर्व अधिकाऱ्यांत समाजाच्या उन्नतीची जेवढी कळकळ असायला हवी तेवढी नाही असें खेदाने म्हणावे लागते. पूर्वी म्हणजे सुमार सव्वाशे वर्षापूर्वी पाश्चात्य पद्धतीचे शिक्षण देणारे बहुतेक लोक ख्रिस्ती होते. त्यांनीच अनेक शाळा सुरू केल्या होत्या. युरोपातून एक शिक्षक येथे येई, जवळ जवळ पंचवीस तीस वर्षे लागोपाठ निश्चयाने आणि तन्मयतेनें शिकविण्याचें पवित्र कार्य करीत असे. त्याच्या चारित्र्याचा, सुस्वभावाचा, निश्चयाचा, वक्तशीर पणाचा, धर्म निष्ठेचा आणि मुख्य म्हणजे स्वकर्तव्या विषयी अहोरात्र जागृत असल्याचा प्रत्यय विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आल्यामुळे विद्यार्थी आपोआपच शिक्षकाविषयी आदर बाळगू लागत. हिंदुधर्मातून जे शिकले सवरलेले लोक ख्रिश्चन धर्मात गेले त्यांच्या मनावर या युरोपातून येणाऱ्या ख्रिस्ती शिक्षक मिशनऱ्यांचा फार परिणाम होत असे. याचा पुरावा म्हणून बाबा पदमनजी यांचें आत्मचरित्र 'अरुणोदय' हें वाचकांनी मुद्दाम वाचावें.

या उलट आपल्या समाजातील त्यावेळचे उच्चवर्णीय शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना आपुलकीने वागवीत नसत. 'हा ह्या जातीचा तर हा दुसऱ्या जातीचा' असें म्हणून दुजाभाव करीत. यामुळे आपल्या समाजाबद्दल साहजीकच आपल्याच लोकांच्या मनात तिरस्कार आणि घृणा निर्माण होत असल्यास नवल नाही. ही

गोष्ट फार घातुक अशी होती. हेही अज्ञानाचेंच लक्षण आहे. आता पर्यंत अस्पृश्यांना जवळ बसवून घेणें आणि इतरांच्या बरोबरीने शिकविणें यात शिकविणारा मनुष्य भेदभाव करीत असे. यामुळे आपला समाज सुसंघटित तर राहूच द्या पण रानोमाळ पसरलेल्या पाचोळ्या प्रमाणे इतस्ततः पसरलेला आणि बहुधा एकमेकांच्या विरुद्ध वाईट कृत्य करण्यातच पुढाकारी मारणारा असा होत चालला आहे.

विद्या घेणारा आणि विद्या देणारा हे निष्ठावान पाहिजेत. त्यांच्या ठिकाणी एकमेकाबद्दल श्रद्धा पाहिजे. अशी विद्यार्थ्याची आणि शिक्षकाची परंपरा निर्माण झाली पाहिजे. जें शिक्षण, जो संस्कार, जी सद्भावना आणि जो संयम विद्यार्थ्याचा शिक्षण घेता घेता तयार होत जाईल तोच त्याला पुढील आयुष्यात उपयोगी पडेल आणि तेणे करून त्याचे आणि समाजाचे भलें होईल. शिक्षणा बरोबर समाजात सुसंस्कार आणि सद्सविचार आणि आचार यांचा प्रसार झाला पाहिजे. ही गोष्ट निष्ठावान शिक्षक निर्माण करू शकतो. अशा त.हेची निष्ठा शिक्षकात आणि विद्यार्थ्यात नसेल तर दोघांचेही कार्य पालथ्या घागरीवर पाणी ओतण्यासारखें आहे. म्हणूनच 'गीतारहस्य' या ग्रंथात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी म्हटलें आहे की (१)"कोणत्याही शास्त्राची माहिती करून घेण्याची एखाद्यास जर पूर्वी इच्छा नसेल तर तो तें शास्त्र शिकण्यास अनधिकारी होतो आणि अशा अनधिकारी पुरुषास ते शास्त्र सांगणें पालथ्या घागरीवर पाणी ओतण्यासारखें आहे. शिष्याला त्यापासून काही फायदा होत नाही. इतकेंच नव्हे तर गुरुसही विनाकारण श्रम होऊन दोघांचाही काळ व्यर्थ जातो."

(१) 'गीतारहस्य' - बाळ गंगाधर टिळक.

आजही प्राथमिक शाळेपासून तर थेट विश्वविद्यालयातील शिक्षणापर्यंत मोठ्या हिरीरीने या कार्याला वाहून घेतलेले शिक्षक थोडेच आहेत. केवळ काम करायचें म्हणून करायचें, या पलीकडे त्यांना त्यांच्या कामांत विशेष गम्य वाटत नाहीं. अर्थात सर्वच शिक्षक असे आहेत असें नाही. परंतु पूर्वी ज्याप्रमाणे 'हा ह्या जातीचा आणि हा ह्या जातीचा' म्हणून शिकविणारा दुजाभाव करीत असे त्याप्रमाणे आज काम कसें तरी करून वेळ मारून न्यायची ही वृत्ति वाढत आहे. यामुळे आपल्या विद्यार्थ्यांचें आणि आपल्या समाजाचें कितीतरी नुकसान होत आहे.

या उलट आजही हजारो मैलावरून ख्रिस्ती धर्माचा प्रचार करण्यासाठी येथे येणाऱ्या मिशनरी लोकांत मोठी तळमळ आणि कष्ट सहन करण्याची तयारी दिसून येते. हे ख्रिस्ती प्रचारक तनमनधनाने प्रचार करीत असतात. अरण्यांत किंवा अडचणीच्या ठिकाणी जाऊन भिल्ल, कातकरी, आदिवासी आणि इतर अनेक मागासलेल्या जमातींच्या गाठीभेटी घेतात आणि त्यांच्या सर्वतोपरी उपयोगी पडतात. गेल्या वर्षी ११ डिसेंबरला मी झाबुआ या गांवी गेलो होतो. हें गांव इंदूर शहराच्या पश्चिमेस ऐंशी पंच्याऐंशी मैलावर जिल्ह्याचे ठिकाण आहे. त्या दिवशी तेथे हजारो आदिवासी एकत्र जमून चर्च मध्यें ढोल व झांज वाजवून रात्रभर नाचत होते. हे सर्व ख्रिस्ती झालेले आदिवासी होते. या आदिवासी लोकांच्या सामाजिक किंवा आर्थिक स्थितींत खरोखर काही बदल झालेला आहे असें नाही. किंवा ते शिकून सवरून ज्ञानी झालेले आहेत असेंही नाही. परंतु काही मिशनरी लोकांच्या त्यागामुळे त्यांना ख्रिस्ती धर्माचा लोभ वाटून ते ख्रिस्ती बनले आहेत. म्हणजे मनुष्य जातीने कोणीही असो त्याला ख्रिस्ती धर्मांत मज्जाव नाही. अशा ख्रिस्ती मिशनऱ्यांचा प्रभाव पडल्यामुळेच बाबा पदमनजी हे

ख्रिस्ती झाले. ही गोष्ट खरोखर उपेक्षणीय नाही. आपल्या लोकांनी आदिवासी, हरीजन, आणि इतर मागासलेल्या सर्व जातींच्या उद्धारासाठी अगदी एका पायावर तयार असायला पाहिजे. या शिवाय दुसरा कोणताच मार्ग नाही. जोंवर अशांत,हेचें प्रचारक म्हणा, शिक्षक म्हणा, गोरगरीबांचा कळवळा घेऊन आचार्य विनोबा भावे यांच्याप्रमाणें समता निर्माण करणारे कार्यकर्ते म्हणा हिंदु समाजांत निर्माण होणार नाहीत तोवर हिंदुसमाजाची ही विस्कळलेली स्थिती सुधारणार नाही. यास्तव स्वार्थत्यागी कार्यकर्त्यांची परंपरा निर्माण करणें हा एकच एक मार्ग निदान आजतरी सुचविता येण्यासारखा आहे.

## ४ समतेची आवश्यकता

बाबा पदमनजी यांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. ती बातमी सर्वत्र पसरताच शंभर वर्षांपूर्वी 'ज्ञानप्रकाश' या वर्तमानपत्रांत काय वृत्त प्रकाशित झालें होतें तें पाहण्यासारखें आहे. ज्ञानप्रकाशकार लिहितात (१) " बाबा पदमनजी कांसार राहणार मुंबई यांही गेल्या वीसावे तारखेस ख्रिस्ती धर्म बेळगांवास स्वीकारला. हें वृत्त वर्तमानपत्रांत छापून प्रसिद्ध झालेंच आहे. परंतु आम्हास एका आमच्या मित्रास घरगुती पत्र आलें त्यावरून असें समजलें की सदरहू गृहस्थानें आपल्या बायकोस समागमें नेण्याविषयी पुष्कळ प्रयत्न केला परंतु तिनें त्यांच्या गोष्टीस मान्य केलें नाही. बाबा पदमनजी हे इंग्रजी शिकलेले आहेत. परंतु यांचा कल पुष्कळ दिवसापासून ख्रिस्ती धर्माकडेसच असे. त्यानें स्त्री विद्याभ्यास निबंध,सणाविषयी निबंध,

---

(१) 'अरुणोदय' - ऑगस्ट १८८८ .. बाबा पदमनजी .. पृष्ठ २१०

व्यभिचार निषेधक बोध आदिकरून पुस्तकें मराठींत केली आहेत. त्यांत बैबलांतलीं वाक्यें घेतलीं आहेत. श्रुतीस्मृती सारखीं गौरवून लिहिलीं आहेत. त्याकरनच त्यांची श्रध्दा त्या धर्मावर आहे असें स्पष्ट दिसतें. धूमकेतूत बाबा पदमनजीचें स्वहस्तुरचे लांबलचक पत्रांत ख्रिस्ती धर्म रानीबुधीने व अक्कल हुशारीने क्सा त्यांनी स्वीकारला हें वृत्त आहे. सर्व मनुष्यास आपापल्यापरी शहाणपणाचा ताठा असतोच आणि हा क्रम दीर्घ काळापासून चालत आला आहे. तेव्हा बाबा पदमनजीने लिहिलें त्याचा मोठा हर्ष मानावा असें नाही. परंतु आपण जें करितों तेंच लोकांनी आचारावें हें बोलणें बरीक उपहासास्पद होय ..( ज्ञानप्रकाश ) "

हा उतारा येथे देण्याचें कारण एवढेच की ज्या शिकल्यासवरल्या लोकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला तो त्यांनी कां स्वीकारला म्हणजे त्यांना हिंदुधर्मांतून उठून जावेंसें कां वाटलें याचा सांगोपांग चर्चा व मनन करून त्या पासून काय बोध घ्यावयाचा आहे तो आपण घ्यावा. इतकेंच नव्हें तर त्याप्रमाणें आचरण सुधारावें आणि जेणें करून आपल्या हिंदुधर्मात समता निर्माण होईल त्या गोष्टी अंत:करणापासून कराव्यात.

कारण आपल्याला लोक हलक्या जातीचे समजतात, कोणी आपल्याला बरोबरीच्या नात्याने वागवीत नाही, प्रोत्साहन तर दूरच राहिले पण प्रत्येकजण आपल्याला मुद्दाम टाळतो, आपल्या अंगी असणाऱ्या गुणांना कोणी वाव देत नाही आणि चोहीकडून आपला जीव गुदमरतो आहे अशी स्थिती झाली म्हणजे मग मनुष्य कायमचा चेपला तरी जातो किंवा आपटलेला चेंडू उसळी घेतो त्या प्रमाणें हा मनुष्य सूड घेण्याच्या भावनेने प्रेरित होऊन त्या उद्योगास तावातावाने लागतो. या दोन्ही गोष्टी त्याज्य आहेत, याचा विचारवंतांनी खोल विचार करावा. आपल्या धर्मांत

'हा हा जातीचा आणि हा हा जातीचा' असें समजून तसें वर्तन अजूनही पुष्कळजण करतात ही खेदाची गोष्ट आहे. बाबा पदमनजी यांनी आत्मचरित्र लिहिलें म्हणून त्यांचें म्हणणें आपणास कळलें. परंतु त्यांच्या सारखे असे किती तरी सुशिक्षित लोक पूर्वी ख्रिस्ती बनले. त्यांनी आपापली आत्मचरित्रें लिहिलीं असती तर हिंदुधर्मात त्यांना समतेची वागणूक मिळाली नाही हें प्रमुख कारण आहे असें आपणास दिसून येईल. एकीकडे आम्ही हिंदुधर्मातील शिकले सवरलेले लोक उदासीन तर तिकडे मिशनरी लोक संघटित आणि ध्येयाने प्रेरित झालेले, एकीकडे आम्ही एकमेकांना तुच्छ लेखण्यांत फुशारकी मारतो तर ते ख्रिस्ती लोक भावाभावाप्रमाणें आणि प्रेमाने वागायला एका पायावर तयार, एकीकडे आपल्या एवढ्या मोठ्या हिंदुस्थानांत आदिवासी अशा भिल्ल कातकरी या लोकांच्याकडे आम्ही शिकले सवरलेले लोक ढुंकूनही पाहायला तयार नाही तर ख्रिस्ती मिशनऱ्यांनी साऱ्या हिंदुस्थानांतच नव्हें तर साऱ्या जगांत ख्रिस्ती धर्माच्या प्रचाराचें जाळें मोठ्या कुशलतेने, सुसंघटितपणें आणि दृढनिश्चयानें ~~चालविलें~~ विणलें आहे. शिवाय मुलांच्या नि स्त्रियांच्या साठीं मोफत दवाखाने काढणें, शिक्षणप्रसारासाठीं प्राथमिक शाळेपासून तर विश्वविद्यालयापर्यंत शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून त्या संस्थांतून ख्रिस्ती झालेल्यांना सवलती व प्रोत्साहन देणें हें त्यांचे कार्य आज कित्येक वर्षां पासून सुरळीत, सुव्यवस्थित आणि बिना गाजावाजा करिता चाललेलें आहे. याचा व्हायचा तोच परिणाम होत आहे. हें आम्ही शिकले सवरलेले लोक उघड्या डोळ्यांनी पाहतो परंतु त्या पासून काही बोध घेऊन वर्तन मात्र सुधारीत नाही. परक्या देशांतून येऊन येथील लोकांना शिक्षण देण्याचे कार्य जे मिशनरी आज शेकडों वर्षांपासून करीत आहेत त्या पासून

आम्ही हिंदुधर्मातील शिकल्या सवरलेल्या लोकांनी काय बोध घेतला.?

या बाबत उद्योगरत्न श्री वि.रा.वेलणकर यांनी " मी कारखानदार कसा झालो ?" या आत्मचरित्रात मोठ्या मार्मिकपणे विचार मांडले आहेत. ते वाचकांनी अवश्य पाहावेत. हिंदुसमाजातील सुशिक्षितांनी एक पायरी खाली उतरून खाली पडलेल्यांना वर उचलण्याची आणि आपल्या पायावर उभे करण्याची पराकाष्टा केली पाहिजे. कारण सुशिक्षित लोक मोठेपणाच्या घमेंडीत राहिले आणि खाली पडलेल्यांची मनापासून विचारपूस करण्याचे नि त्यांना मदत करण्याचे महत्कार्य जो पर्यंत आपण अंत:करणापासून करणार नाही तो पर्यंत आपल्या हिंदु धर्मातील लोकांची सध्या जी लांडगेतोड होत आहे ती थांबणार नाही हे आपण सर्व सुशिक्षित बंधु भगिनींनी पक्के लक्षात ठेवावे.

आता कोणी म्हणेल की सुशिक्षितांनी खालच्यांना वर उचलायचे म्हणजे त्यांना प्रथम खालच्या पायरीवर जावे लागेल आणि खालच्यांना वर उचलता उचलता ते वर उचलणारेच खाली पडून जातील. परंतु खरोखर पाहता असा कोता विचार आपल्या मनात येऊ नये. अडाणी लोकांना, अडचणीत सापडलेल्यांना, सर्वतोपरी लाचार झालेल्यांना सहाय्य करणे आणि मनुष्य म्हणून जगण्याची संधी प्राप्त करून देणे हे तर खरोखरमोठे महत्कार्य आहे असे आपण मानले पाहिजे. प्रत्येक जातीचा मनुष्य फक्त आपल्याच जातीचा विचार करील आणि समाजातील इतर जाती बांधवांच्या विषयी उदासीन राहील तर त्यामुळे समाजाच्या उन्नतीत भर न पडता उलट आपली अधोगतीच होत राहील हे ही आपण पक्के लक्षात ठेवले पाहिजे.

यास्तव उद्योगरत्न श्री. वि.रा.वेलणकर यांची 'शिक्षण की समाजसेवा हीच ईश्वरसेवा' ही आपण सर्वांनी लक्षात ठेवावी. आपण सर्व सुशिक्षित बंधु .. भगिनींनी दृढ निश्चय करून सतत उद्योगाला लागणें हाच एक मार्ग आहे, याशिवाय दुसरा मार्ग नाही. असें झालें तरच आपल्या समाजांत सामाजिक आणि आर्थिक समता स्थापन होईल. आणि जोंवर समता स्थापन होणार नाही तोंवर आपल्या हिंदुसमाजांत एकजिनसीपणा, आपुलकी आणि सुसंघटना स्थापन होणार नाही. ज्या आपल्या हिंदुधर्मशास्त्रांत समतेची थोरवी पुन्हा पुन्हा गायिली आहे आणि ज्या आपल्या थोर संतांनी प्रत्यक्ष आचरणाने समता स्थापन करण्याचे कार्य करून आपणाला आदर्श घालून दिला आहे त्या आपण सर्व सुशिक्षित बंधुभगिनींनी निश्चय केला तर हें समता स्थापन करण्याचे कार्य खरोखर अवघड नाही. (१) "प्रथम मनोरचना बदलली पाहिजे. आपल्या बांधवांतला चांगुलपणा पाहण्याचा आणि शिकण्याचा कार्यक्रम ब्राम्हणांनी हातीं घेतला पाहिजे." म्हणजे हे कार्य सुलभ होऊन आपल्या समाजांत समता स्थापन होण्यास विलंब लागणार नाही.

५

## सार्वजनिक नीतिमत्ता

परंतु यासाठीं आपलीं सर्वांचीं मनें राष्ट्राच्या उज्वल भवितव्याविषयी विषयी होणाऱ्या विचारांनीं प्रथम भारली गेली पाहिजेत. म्हणजे सार्वजनिक विचार, सार्वजनिक उच्चार आणि सार्वजनिक आचार या गोष्टी आता आपल्या

(१) 'ब्राम्हण ब्राम्हणेतर वादाचे स्वरूप आणि मूळ' .. श्री.के.क्षीरसागर यांचा लेख 'सुगंध' दिवाळी अंक १९६० पृष्ठ ४७

सर्व सुशिक्षित बंधुभगिनींच्या अंगवळणी पडल्या पाहिजेत. या विषयी सुप्रसिद्ध लेखक श्री. ना.गो.चापेकर यांचे विचार मोठे मौलिक आहेत. ते म्हणतात (१) " दुसरी उणीव आम्हाला जाचते , ती म्हणजे सार्वजनिक नीतिमत्तेचा अभाव. व्यक्तिविषयक नीतिकल्पना आमच्यामध्ये पुरेपूर आहेत;परंतु सार्वजनिक नीतिमत्ता आम्हास कोणी कधी शिकविलेली नाही. सांप्रत राज्यकारभारांत जो ढिलेपणा उत्पन्न झाला आहे व लाचलुचपत आणि वशिलेबाजी हे दोन प्रकार धिंगाणा घालीत आहेत, त्याला वर वर्णिलेल्या दोन गोष्टी बव्हंशी कारणीभूत आहेत. दीडशे वर्षे अंगवळणी पडलेल्या शिक्षण पद्धतींत आमूलाग्र फरक करण्यास कोणी धजत नाही. "

असात,हेने सामाजिक नीति निर्माण झाली तर ज्याला इंग्रजीत National Character - म्हणजे राष्ट्रीय शील म्हणतात तें निर्माण व्हायला अवधी लागणार नाही. घरांत अंधार असला तर दिवा लावताच आपोआप अंधार नाहीसा होतो. त्याप्रमाणें आपल्या सर्व सुशिक्षित बंधुभगिनींची मनें सार्वजनिक नीतीनें आणि राष्ट्रीय शीलानें जर भारली गेली तर जातीयता,हेवेदावे, असूया, व्देष, लाचलुचपत आणि इतर अनेक दुर्गुण आपोआप कमी कमी होत जातील. जोंवर सामाजिक नीतिमत्ता ही फार मोलाची बाब आहे आणि ती आपल्या ठिकाणी असायलाच पाहिजे हा विचार आपल्या सर्व स्त्री पुरुषांच्या मनांत स्थिर होणार नाही तोंवर आपल्या वागणुकींत बदल होणार नाही. वास्तव सार्वजनिक नीतिमत्तेचें महत्त्व जेवढें सांगावें तेवढें थोडेच आहे.

---

(१) ' आमच्या समाज जीवनाविषयीं माझें मनोगत ' ..श्री.ना.गो.चापेकर ' किर्लोस्कर ' - ऑगस्ट १९५९ पृष्ठ १०.

आपल्या समाजात राष्ट्रीय चारित्र्य नाही म्हणून आपलें राज्य गेलें असा मोलाचा विचार दादोबा पांडुरंग यांनी आपल्या आत्मचरित्रांत चांगल्या त.हेने स्पष्ट करून दाखविला आहे. प्रत्येक मनुष्य स्वार्थसाधु आणि आपल्याच पायापुरता पाहणारा असला म्हणजे थोड्या थोड्या प्रमाणांत सर्वांचीच हानी होते. उलट प्रत्येक मनुष्याने थोडाथोडा त्याग केला तर सार्वजनिक कार्य व्हायला मदत होते. खाली पडलेल्यांच्या उद्धारासाठीं सार्वजनिक कामाची थोरवी आणि त्या साठीं अंत:करणापासून तळमळ आपल्या ठिकाणीं जेवढी असायला पाहिजे तेवढी नाही. नाहीतर मुठभर इंग्रज लोक आपल्या एवढ्या मोठ्या देशावर दीडशें वर्षे पर्यंत राज्य करूं शकले नसते. आपल्या देशांतील लोकांच्या इंग्लंड देशांतील चार पटींहून जास्त असतांना इंग्रजांनी आपणांस अनेक वर्षे गुलामगिरींत ठेवलें त्याचे कारण हेंच होय. ही गोष्ट आपण अंत:करणांत निदान आता तरी सतत बाळगली पाहिजे. म्हणजे झाली ती चूक आपल्या हातून पुन्हा होणार नाही.

सार्वजनिक शिक्षण संस्था, रुग्णालयें, बागबगीचें, प्राणीसंग्रहालयें,आणि इतर अशी सर्व ठिकाणें ही आपणा सर्वांच्या उपयोगाची साधनें आहेत, तेथली स्वच्छता ठेवणें आणि तीं सर्व ठिकाणें सुरक्षीत कशी राहतील याची काळजी वाहणें हें आपणा सर्वांचे कर्तव्य आहे, याची जाणीव निर्माण होणें आणि त्याप्रमाणें आपल्या हातून वर्तन घडणें म्हणजेच सार्वजनिक नीतिमत्ता निर्माण होणें होय. उदाहरण म्हणून अशा कितीतरी गोष्टी सांगतायेण्यासारख्या आहेत, परंतु एवढ्यावरून काय तें समजावें. या योगाने आपल्या राष्ट्रासाठीं आणि मनुष्यजातीच्या कल्याणासाठीं आपण अविरत झटावें हा विचार आपल्या मनांत पुन्हा पुन्हा उसळी मारून येईल आणि त्यायोगें आपलें आणि सर्वांचें कल्याण होईल. सार्वजनिक नीतिमत्ता ती हीच होय.

## ६ प्रयत्नांची पराकाष्ठा.

जसें आपण सार्वजनिक नीतिमत्तेबद्दल जागरूक राहायला पाहिजे तसेंच आपण कोणतेंही सार्वजनिक कार्य करताना प्रयत्नांची पराकाष्ठा करायला शिकलें पाहिजे. पाऊणशें वर्षांपूर्वी स्त्री शिक्षण प्रसारासाठी डॉक्टर धोंडो केशव उर्फ अण्णासाहेब कर्वे यांना फार खस्ता खाव्या लागल्या. त्यांच्याहि अगोदर न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांना स्त्री शिक्षणाचें महत्व समजाऊन देण्यांतच पुरी हयात खर्च करावी लागली. कारण शिक्षणानें "स्त्रिया अळ्यांत राहणार नाहींत" अशी त्या वेळीं लोकांची समजूत होती. परंतु शिक्षण घेतल्यावरही स्त्रियांच्या ठिकाणी सोशिकपणा, शालीनता आणि प्रेमळपणा हे गुण पूर्वी प्रमाणेंच दिसून येतात एवढेंच नव्हे तर त्यांचें कार्यक्षेत्रही वाढतें हे सर्वांच्या प्रत्ययास आलें. याचा पुरावा म्हणून रमाबाई रानडे यांचें नांव सर्वांनी लक्षांत ठेवण्यासारखें आहे. "आमच्या आयुष्यांतील आठवणी" या आत्मचरित्रपर ग्रंथाला नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी जी प्रस्तावना लिहिली आहे ती या मुद्यावर अधिक प्रकाश टाकणारी आहे. ती वाचकांनी मुद्दाम पहावी. तसेंच स्त्री शिक्षणाची महती समजाऊन घ्यायची तर रमाबाई रानडे यांनी लिहिलेल्या "आमच्या आयुष्यांतील आठवणी" आणि डॉक्टर अण्णासाहेब कर्वे यांचें "आत्मवृत्त" हें ग्रंथ वाचकांनी समग्र वाचावेत असें निक्षून सांगावेसें वाटतें.

या आणि इतर आत्मचरित्रावरून आणखी एक बोध आपल्या लक्षांत येतो तो हा की आपण हिंदवासीयांनी आता दैववादावर भर देऊं नये. दैवानें

काही काही गोष्टी घडतात हें खुद्द साहित्यसम्राट केळकरांनीही आपल्या आत्मचरित्रांत म्हटलें आहे. परंतु " देव असें असें घडविणार आहेच म्हणून मी आपला मेहनत न करता गप्प असतो " अशी वागणूक तात्यासाहेबांनी उभ्या आयुष्यात कधीही केली नाही हेंही आपण लक्षात ठेवावें. उलट त्यांचा सारा भर प्रयत्नवादावर होता. 'केसरी' आणि 'मराठा' यांचा संपादकीय भार कुशलतेने सांभाळूनही त्यांनी कितीतरी वेगवेगळ्या विषयावर इतकें साहित्य निर्माण केलें की त्यांचा विश्वास पूर्णपणें प्रयत्नवादावर अधिक होता हें वेगळें सांगायची आवश्यकताही नाही.

श्री चक्रवर्ती राजगोपालाचारी एकदा म्हणाले होते की हिंदुस्थानचे लोक आळसात अधिक वेळ घालवितात. हें त्यांचें म्हणणें खरें आहे. आपल्या देशात काही लोकांना मरेमरे पर्यंत कष्ट करावे लागतात तर काही खुशालचेंडू लोक सकाळ पासून तर संध्याकाळपर्यंत गाद्या गिरद्यावर खुशाल लोळत राहतात. काहींना एकेक दिवस कसा जाईल याची रात्रंदिवस चिंता वहावी लागते तर काहींना कोणत्याच गोष्टीची चिंता नाही. म्हणजे काहींना काळजीमुळे जिणें असह्य झालें आहे तर काही श्रीमंत लोक इतरांना सतत निष्कारण त्रास देत आहेत. ही गोष्ट तिरस्करणीय आहे. मनुष्याच्या खाण्यापिण्यात, वागण्यात, कष्ट करण्यात आणि इतर सर्व व्यवहारात तारतम्य पाहिजे. नाहीतर त्याची वृत्ती एकलकोंडी किंवा अतिरेकी बनते. त्याप्रमाणे समाजाच्या उन्नतीसाठी म्हणून आपण सर्वांनी आपल्या विचारात आणि कृतींत योग्य ती काळजी घेण्याची वेळ आलेली आहे हें कोणासही मान्य होईल.

एक तर आपल्या देशांत अज्ञानी लोकांचे प्रमाण अधिक आहे. त्यांतही दीडशें वर्षें पारतंत्र्यात गेल्यामुळें लोकांची कूपमंडूक वृत्ति इतकी बोकाळलेली आहे की स्वातंत्र्य मिळून तेरा वर्षे लोटली तरी लोकांच्या विचारांत आणि आचारांत फारसा बदल झालेला नाही. म्हणजे समाजाला मोठे करण्याचे उंच विचार अजूनही आम्ही आपल्या मनांत आणायला तयार नाही. यामुळे कोणतेंही सत्कृत्य करण्यांत प्रयत्नांची पराकाष्टा करण्याची आणि त्यांतच जीवनाचें सार्थक आहे असें समजण्याची कुवत आमच्या ठिकाणी आलेली नाही. आपल्या डोळ्यांदेखत रशिया, अमेरिका आणि इतर राष्ट्रें सहकारी तत्वाच्या जोरावर प्रयत्नांची पराकाष्टा करून चंद्रावर जाण्याचा आणि नवीन नवीन शोध लावण्याचा प्रयत्न करीत असतांना आपण हिंदुस्थानांतील बहुसंख्य लोक मात्र अशिक्षितपणामुळें दैववादावर भरवसा ठेवून वागत आहोत आणि आळसांत अधिक वेळ घालवीत आहोत ही गोष्ट कोणालाही नाकारता येणार नाही. या आळसावर आपण विजय मिळवावा म्हणूनच की काय आपल्या भारताचे पंत प्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना जाहीर रीतीने "आराम हराम है" हें स्पष्ट सांगावें लागलें.

कारण समाजाच्या अंतःकरणांत प्रयत्न हाच परमेश्वर ही प्रेरणा जोंवर स्थापन होणार नाही तोंवर आपल्या कृतींतही फारसा बदल होणार नाही. समर्थ रामदास स्वामींनीही 'यत्न तो देव जाणावा' असें म्हणून प्रयत्नांची महती गायिली आहे. तुकाराम महाराजांनीही "असाध्य तें साध्य करितां सायास। कारण अभ्यास तुका म्हणे ॥" हें सांगून आपण सर्वांनीं प्रयत्नांची पराकाष्ठा करावी असेंच ध्वनित केलें आहे.

आज आपल्या भोवताली शिक्षण प्रसाराचे कार्य फार मोठ्या प्रमाणावर रेंगाळत पडलें आहे. समाजात असे अनेक लोक आहेत की त्यांची दात आहेत तर चणे नाहीत आणि चणे आहेत तर दात नाहीत अशी अवस्था आहे. अशा वेळीं आपण सर्व सुशिक्षित बंधुभगिनींनी निदान या शिक्षण प्रसाराच्या कार्यांत तरी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. अडचणींत असणाऱ्यांना तन, मन आणि धन, या पैकी ज्या योगाने सहाय करता येईल तें केले पाहिजे. कारण आजच्या घटकेला असा प्रयत्न केवळ एकट्या दुकट्याने करून भागणार नाही. नुसत्या सरकारनेच हें करायचें म्हटलें तरी शक्य नाही. सरकारचा पुढाकार आणि जनतेचें सक्रीय सहकार्य जर घडून आलें तर हें कार्य सुलभरीतीने घडून येईल. म्हणून आपण सर्वांनी 'एकमेका सहाय करूं ; अवघे धरू सु पंथ ॥ ' असें ध्येय समोर ठेवलें पाहिजे.

अशात.हेने योजनाबद्ध होऊन जर आपण आपल्या समाजांतील सर्वांच्या सोडवायला लागलो तर प्रथम जरी पुष्कळ त्रास झाला तरी पुढे प्रगती होत राहील. आळसांत आणि भांडणांत वेळ घालविण्यापेक्षा हें अधिक बरें. कारण अज्ञान, आळस आणि अहंभाव या गोष्टी एकाच माळेतल्या मण्या प्रमाणे आहेत. आपण अज्ञानी आहोंत याला बव्हंशी कारण आपणच आहोंत हें आपल्याला उमगलें पाहिजे. आपण जोंवर जीवंत आहोंत तोंवर मोठ्या हिरीरीनें कार्य करीत राहिले पाहिजे, कारण यांतच आपलें आणि समाजाचें हित आहे. हा विचार न्यायमूर्ति रानडे यांनी मोठ्या समर्पकपणे मांडला आहे तो येथे मुद्दाम सांगतों.

(१) " हें वन्संचें बोलणें ऐकून थोडावेळ काही उत्तर दिलें नाही. जेवण चाललें होतें पण त्यातही लक्ष नव्हतें. घास तोंडात न जाता तो कितीतरी वेळ

(१) ' आमच्या आयुष्यांतील आठवणी ' .. रमाबाई रानडे. पृष्ट २६७-२६८.

हातातच घोळत राहायाचा. एकदा उचलावयाचा पुन्हा खाली ठेवावयाचा. हा पदार्थ जवळ घे तो दूर सार अज्ञातच वेळ घालविणें चाललें होतें. मन काहीतरी विचारांत निमग्न होतें खास. हें वन्सींच्याही लक्षांत येऊन काहीतरी बोलावे म्हणून त्या म्हणाल्या " मग आता महाबळेश्वरीच जावयाचे ना! तेथेच गेले म्हणजे बरें वाटेल. पण काम वाचन वगैरे फार करता कामाचे नाही. डॉक्टर सांगतात तशी स्वस्थ पडून विश्रांती घेतली तर बरें वाटेल. नाहीतर येथल्या सारखे चालविलें तर कोठेही गेलें म्हणून काय सारखेंच!" असें म्हणून त्या गप्प बसल्या.

तेव्हा स्वतः म्हटलें " काय तुमची समजूत आहे कोण जाणे. मला तर राहून राहून या बद्दल आश्चर्य वाटतें. तुम्हाला असें का वाटते की नुसत्या हटानें जाणून बुजून मी हें दुखणें वाढवीत आहे. हा तुमचा दोष राहू नये हें एक व दुसरें आयुष्य असें पर्यंत मनुष्याला आपला उद्योग करता यावा ह्या दोन्ही उद्देशांनीं तर रात्रंदिवस जीं कोणी द्याल तीं औषधें मी घेत आहे. बाकी औषधें व डॉक्टर काय करणार आहेत तीव्र इजा कमी करणारी तीं साधनें व यंत्रें आहेत. इतकेंच खरें समजावयाचें. हें का तुम्हाला समजत नाहीं ? ही सुद्धां जेव्हा तेव्हा असेंच म्हणते की विश्रांती घ्यावी विश्रांती घ्यावी. पण विश्रांती म्हणजे काय ? ज्यामध्यें मन रमतें, समाधान पावतें, शारिक शारिक वेदना सहज विसरल्या जातात, त्या सवयींच्या व करमणुकीच्या वाचना सारख्या गोष्टी सोडल्याने विश्रांती मिळेल काय ? ज्याला उगीच बसण्यात विश्रांति वाटून सुख लागणार असेल तें त्याचें सुख त्यालाच लखलाभ होवो. हातून कोणत्याही प्रकारचें काम न होता नुसतें पडून राहून निरर्थक आयुष्य घालविण्याची पाळी आली तर तें आजच संपलें तरी हरकत नाही असें मनुष्याला वाटेल."

इतका आळसाचा तिरस्कार प्रत्येक माणसाला वाटला पाहिजे, आणि उद्योगावर, सहकार्यावर, महत्त्वाकांक्षेवर आणि प्रयत्नवादावर आपली भक्ती जडली पाहिजे. आपणा सर्वांच्या ठिकाणी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची तळमळ निर्माण झाली तर संकटांचे ढग हळूहळू नाहीसे होऊन समतारूपी सूर्य उगवायला वेळ लागणार नाही.

## ७ ॥ आपल्याला काय करायचें आहे? ॥

दादोबा पांडुरंग यांच्या आत्मचरित्राची ओळख करून घेतांना वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल की ते सुरतेंत असतांना त्यांचा एक लहान मुलगा निवर्तला. तेव्हा समोर राहणाऱ्या महाराष्ट्रीय लोकांनी आपल्या घराची दारें व खिडक्या एकामागून एक बंद करून घेतल्या. त्यावेळी दादोबा एकटेच महाराष्ट्रीय असतांना आणि तें अज्ञात, हेंने संकटांत व दुःखात असतांना त्यांना मदत व दिलासा देण्याचें तर दूरच राहिलें पण उलट समोर राहणाऱ्या महाराष्ट्रीय लोकांनी आपल्या घराची दारें व खिडक्या बंद केल्या. ही जी तुटक त,हेने वागण्याची आपल्या लोकांची त,हा आहे ती फार घातुक आहे. दगड व चुना या वस्तू अलग अलग पडलेल्या असतील तर त्यांचा काय उपयोग? त्यामुळें आपल्या देशांत समतेचे मंदिर लौकर स्थापन होऊं शकेल काय? आज स्वातंत्र्यानंतरही एकमेकांच्या विषयी ही उदासीनवृत्ति आमच्या लोकांच्या मानगुटीवर अजूनही बसलेली आहे. आम्ही एकमेकांच्या बद्दल वागतांना 'आपल्याला काय करायचें आहे?' अशा वृत्तीनें आपण वागतों. ही वृत्ति घातुक नाही का?

दुसऱ्याचें नुकसान तें माझें नुकसान, दुसऱ्याचें हित तें माझें हित ही सार्वजनिक भलाईची भावना आपल्या हाडींमासी अद्याप खिळली नाही. त्यामुळें जें सार्वजनिक

काम अगदी अल्प वेळात नि अल्प खर्चात व्हायला हवें त्याला अनेक वर्षे लागून नि अमाप पैसा खर्च होऊनही तें जसें व्हायला हवें तसें होत नाही. हें सर्व उदासीन वृत्तीमुळें होत आहे. उदासीनवृत्तीने वागणें हें वैयक्तीक आणि राष्ट्रीय पाप आहे असें आपण मानलें पाहिजे. माझ्या एवढ्या तेवढ्या प्रयत्नामुळें माझे आणि माझ्या राष्ट्राचे भवितव्य उज्वल होण्याची शक्यता आहे असा भाव सर्वांच्या ठिकाणी थोडा थोडा जरी दिसून आला तरी सर्वांचा मिळून मोठा होईल. थेंबे थेंबे तळें साचें असें म्हणतात तें एवढ्यासाठीच.

मग प्रश्न असा उदभवतो की ही उदासीनवृत्ती कशामुळें जाईल ? तर असें की झाडाचीं पानें वाळल्यावर जशी आपोआप गळून पडतात कारण नव्या येणाऱ्या कोवळ्या लुसलुशीत पानांना जागा द्यायची असते, त्याप्रमाणें आपणा सर्वांच्या मनांत राष्ट्रीय महत्वाकांक्षा निर्माण झाली पाहिजे. अशा महत्वाकांक्षे शिवाय हें होणें शक्य नाही. महत्वाकांक्षा, प्रयत्नांची पराकाष्टा आणि समतेची स्थापना या गोष्टी एकमेकांना पूरक आहेत. एक नाही म्हणून दुसरी साठी प्रयत्न करण्यात काही हांशील नाही असें आपण समजू नये. उलट एका गोष्टीचा पिच्छा पुरवायला आपण सुरुवात केली तर दुसऱ्या गोष्टीही आपोआप घडून येतील.

एकेका मनुष्याचे सदगुण लोकांच्या समोर यायला वीस पंचवीस वर्षांचा काळ सहन लागतो. मग राष्ट्राच्या बाबतींत तर हा काळ कितीतरी मोठा मानला पाहिजे. सुमारे शंभर वर्षांपूर्वी 'लोकहितवादी' यांनी आपण स्वतंत्र होऊन आपल्या देशाचा राज्यकारभार सुरळीतपणें चालवू असे भविष्य केलें होतें. तें आज प्रत्यक्षांत उतरलें आहे. त्याचप्रमाणें पुढील पन्नास पाऊणशें वर्षांत आपल्या हिंदु समाजांतील जातीयता हळूहळू लुप्त होऊन तिच्या जागी राष्ट्रीय वृत्ती येईल

आणि एकमेकांचा हेवादावा न करता एकमेकांना सहकार्य करण्यात आपण भूषण मानू यात तीळमात्र शंका नाही. परंतु हें सर्व आपोआप घडेल असें आपण समजू नये. या साठी उदासीन वृत्ती आपण टाकून दिली पाहिजे. 'आपल्याला काय करायचें आहे?' हा विचार आपण आपल्या मनात कधीही येऊ देऊ नये.

एकावर संकट हें सर्वांवर संकट आहे असें आपण मानलें तर त्या संकटाची झळ त्या एका व्यक्तीला तर कमी लागतेच पण आपण सर्वांनी ते संकट विभागून घेतल्यामुळें आपणालाही त्याचा फारसा त्रास होणार नाही. ही वृत्ती जातीयता नष्ट झाली की आपोआप उदयाला येईल. ज्याप्रमाणें जमीन नांगरून योग्य वेळी पाऊस पडला आणि बी बीयाणें हें ही जर सकस असलें तर ज्वारीचें किंवा कोणतेही पीक फोफावतें आणि शेतकऱ्याने त्या पिकाची आणखी काळजी घेतली म्हणजे तण वगैरे काढून टाकलें तर हंगामाच्या दिवसांत भरघोस धान्य आल्याशिवाय रहात नाही. हीच गोष्ट आपल्या हिंदुस्थानाच्या भवितव्याला आपण लावली पाहिजे. राष्ट्रीय वृत्तीची जोपासना, राष्ट्राच्या उन्नतीची महत्त्वाकांक्षा, आणि आपल्या राष्ट्राचें व जगाचें कल्याण व्हावें ही भावना जाज्वल्य असेल तर आपण हिंदी लोक जातीयता हळूहळू नष्ट करून टाकू. शेतकरी ज्याप्रमाणें तणाला उचलून शेताबाहेर फेकून देतो त्याप्रमाणें आपण सर्वांनी जातीयतेला उचलून हिंदी महासागरात ताबडतोब तीलांजली दिली पाहिजे. अंधार आहे म्हणजे उजेड नाही. त्या प्रमाणे आपल्या ठिकाणी राष्ट्रीयता नाही म्हणून जातीयता आणि असूया या बोकाळल्या आहेत. यांना काढून टाकण्यासाठी आपली मनें उच्च विचारांनी भरून गेली पाहिजेत. म्हणजे मग उदासीन वृत्ति आपोआप जाईल.

८

## निष्ठा पाहिजे

ज्यावेळी न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांचे बरोबर रमाबाईंचे लग्न झालें त्यावेळी त्यांना अक्षर ओळख मुळीच नव्हती. पत्राने एका ठिकाणची बातमी दुसरीकडे पोहचविता येते याचेच त्यांना मोठें आश्चर्य वाटत होतें. पण त्यांना सुशिक्षित करण्याचा जणु त्याच दिवशी न्यायमूर्ति रानडे यांनी संकल्प केला. त्यांनी त्याच दिवशी बाजारांतून पाटी आणविली आणि रमाबाईंना शिकवायला सुरुवात केली. त्यासाठी न्यायमूर्तींना प्रत्यक्ष घरातल्या नातेवाईकांकडूनच फार त्रास सहन करावा लागला. प्रत्यक्ष रमाबाईंना किती जाच सहन करावा लागला हें त्यांच्या आठवणी वाचल्याशिवाय कळणार नाही. परंतु ज्ञानासाठी माणसाने निष्ठापूर्वक प्रयत्न केले पाहिजेत याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच रमाबाईंचे हळुहळू शिक्षण होत गेले. पुढे शिक्षणाची गोडी लागल्यावर त्यांनी इंग्रजीचेही ज्ञान प्राप्त करुन घेतलें. जी शिक्षणाबद्दलची आणि समाजहिताबद्दलची निष्ठा न्यायमूर्तींच्या ठिकाणी होती तीच पुढे रमाबाईंच्या ठिकाणीही दृष्टीस पडते. नाहीतर पतिनिधनानंतर त्यांनी स्त्री शिक्षण प्रसाराचें जें सत्कार्य केलें तें त्यांच्या हातून झालें नसते. 'माझ्या एवढ्याशा कृत्यानेही समाजाचें जर भलें होणार आहे तर तें मी केलेंच पाहिजे' ही निष्ठा आणि तळमळ अंगी असल्याशिवाय रमाबाईंच्या हातून हें कार्य खचित झालें नसते.

एवढेच कशाला आपण समाजाचें कोणी लागतो आणि समाजहितासाठी हरप्रकाराने प्रयत्न केले पाहिजेत असा भाव म्हणजेच निष्ठा जर रमाबाईंच्या ठिकाणी नसती तर त्यांनी 'आमच्या आयुष्यांतील आठवणी' तरी कशाला सांगितल्या असत्या ?

त्यांच्या प्रमाणेच समाजहिताची निष्ठा डॉक्टर अण्णासाहेब कर्वे यांच्याही ठिकाणी होती म्हणूनच त्यांनी 'घोटकिल्याप्रमाणें उपयोग होईल म्हणून ' आपलें ' आत्मवृत्त ' लिहिलें.

' स्मृतिचित्रें ' लिहिणाऱ्या लक्ष्मीबाई टिळक या सुशिक्षित नव्हत्या परंतु रेव्हरंड नारायण वामन टिळक यांच्या सहवासांत त्या हळूहळू लिहायला वाचायला शिकल्या. प्रथम प्रथम त्यांना या बाबत बराच त्रास झाला. परंतु शिक्षणाने मनुष्याचा आत्मा मोठा होऊं शकतो याची जाणीव त्यांना पतिपासून मिळाल्या नंतर त्यांनी लिहायला वाचायला सुरुवात केली. आणि पुढे पुढे तर त्यांना वाङ्मयाची गोडी एवढी लागली कीं त्यांनी ' स्मृतिचित्रें ' लिहायला घेतली. हीं स्मृतिचित्रें लिहिण्यांत समाजहिताचीच निष्ठा त्यांच्या ठिकाणी होती हें कोणालाही नाकारता येणार नाही. त्यांनी स्मृतिचित्रांत मात्र असें म्हटलें आहे की मी केवळ करमणुकीसाठी स्मृतिचित्रें लिहिलीं.

एवढेच काय पण ' स्मृतिचित्रें ' लिहिण्याचा उद्योग त्यांनी केव्हा केला ? तर उतारवयांत. म्हणजे दुसऱ्याचे भलें करण्याची निष्ठा त्यांच्या ठिकाणी नसती तर त्यांच्या हातून एवढा उद्योग झाला असता असें वाटत नाही. पुढे पुढे तर त्या ' ख्रिस्तायन ' पूर्ण करण्यासाठी सहासहा सातसात तास स्वतःला कोंडून घेत असत. या विषयी आणि त्यांना अक्षर ओळख किती होती या विषयी कुमारी इंदिराबाई त्रिमुकन यांनी सांगितलेली आठवण येथे अगदी थोडक्यात मुद्दाम देतो.

(१) " ख्रिस्तायन लिहिता लिहिता आईला काही नव्या ओव्या सुचत. त्या एका स्लेट पाटीवर त्या लिहून ठेवीत. तसें आईला फारसें चांगलें लिहिता येत नव्हतें. मला तर मुळीच त्यांची अक्षरें लागत नसत. मी रिकामी

(१) ' स्मृतिचित्रें ' भाग ४ था .. लक्ष्मीबाई टिळक – पृष्ट १७५

झालें म्हणजे पाटीवरची ओवी मिहात असे. ती असरें वाचून मला हसायला येई. परंतु माझ्या हसण्याने आईचा उपमर्द होईल म्हणून मी कधीच तोंडावर हासू दाखविलें नाही. व आणि क्ष कसे लिहावे याचा त्यांना घोटाळा पडे. एका ओवीत दुर्लक्ष असा शब्द त्यांनी लिहिला. तो 'दुर्लव' असा लिहिला होता. मला तें काय आहे हें वाचताच येईना. तेव्हा मी हळूच त्यांना ती ओवी म्हणण्यास सांगितलें. त्यांनी 'दुर्लक्ष' म्हणताच मी समजलें की तो शब्द 'दुर्लव' नसून 'दुर्लक्ष' आहे. असे कितीतरी शब्द विचित्र रीतीने लिहिले जात. एके दिवशी स्लेट पेन्सिल कुठें सापडेना. मी लिहितच होतें. आईला एक ओवी सुचली. त्यांनी कोळशानेच ती ओवी लिहिली. आईनी डोळ्या जवळ पाट धरलेला पाहून मी मोठ्याने हसू लागलें व "काय करतां?" म्हणून विचारलें. तों आईही हसू लागल्या व म्हणाल्या "मला एक ओवी सुचली ती लिहित आहे." आम्ही दोघीही खूप हसलों. शेवटी आईने शब्द सांगितलें व मी एका कागदावर ते उतरून घेतले."

सांगायचा मुद्दा असा की मनुष्याच्या ठिकाणी निष्ठा असेल तर तो रात्रं दिवस प्रयत्न करतो, आणि नसेल तर उदासीन वृत्तीने वागतो. लक्ष्मीबाईंच्या ठिकाणी निष्ठा नसती तर उतारवयात हजारो पृष्ठांचीं 'स्मृतिचित्रें' त्यांच्या हातून लिहून झालीं असती असें वाटत नाही.

आनंदीबाई कर्वे आणि पार्वतीबाई आठवले यांच्याही ठिकाणी समाजसेवा करण्याची तळमळ नसती तर त्यांनी आपापलीं आत्मचरित्रें इतक्या तन्मयतेने सांगितलीं असतीं असें वाटत नाही.

म्हणूनच निष्ठेचें मोल अनमोल आहे. ज्ञान हें निष्ठे शिवाय प्राप्त होण्यासारखें नाही. आणि ज्ञानी मनुष्याचें ज्ञान निष्ठेशिवाय पढतपंडितासारखें

आहे. म्हणूनच यानी माणसालाही निष्ठेची कास धरावी लागते. याच कारणास्तव तुकोबा म्हणतात की 'भाव धरील त्या तारील पाषाण । शहाणे मरती तरी नाहीत ॥' निष्ठावान मनुष्य अडचणींचा बाऊ करीत नाही. एक पाऊल पुढे टाकण्यापुरता जरी प्रकाश दिसला तरी दृढ निश्चयाने प्रगती करीत राहतो. कारण त्याची श्रध्दा तशीच असते. याच कारणास्तव निष्ठेचे महत्त्व सांगावें तेवढें थोडेंच आहे.

या प्रबंधात महाराष्ट्रीय संतांचें आत्मचरित्रपर वर्णन थोडेसे आलेले आहे. तेवढ्यावरूनही या संतांची विठ्ठलाच्या चरणी केवढी ज्वाज्वल्य निष्ठा होती याचा प्रत्यय येतो. अशी या संतांची निष्ठा होती म्हणूनच संकटांच्या पर्वतांतूनही त्यांना प्रेमाचा झरा निर्माण करता आला आणि तो समाजाच्या सर्व थरांतून पसरवून समाजांत नवचैतन्य निर्माण करता आलें. ही गोष्ट सूर्यप्रकाशा इतकी स्पष्ट आहे.

निष्ठावान मनुष्याला प्रयत्न करता करता जरी यश मिळालें नाही तरी त्याचें मानसिक समाधान अबाधित राहतें. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक एकवेळ म्हणाले होतें की आमच्या आयुष्यांत स्वराज्य मिळेल असें वाटत नाही. तरीही पुढें तें मिळेलच मिळेल म्हणून आम्ही निष्ठापूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. आज हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळालें आहे हें खरें. परंतु आर्थिक समता नसल्यामुळें, सामाजिक विषमता माजल्यामुळे आणि मतामतांचा गलबला वाढल्यामुळे निष्ठावान कार्यकर्त्यांचे महत्त्व तर फारच आवश्यक असें झालें आहे. अनेक आत्मचरित्रांच्या पासून आजच्या पिढीने निष्ठापूर्वक सार्वजनिक कार्य करण्याचा कित्ता खरोखरच पुढे ठेवण्यासारखा आहे.

९

## राष्ट्रीय चारित्र्य पाहिजे

दादोबा पांडुरंग यांनी आपल्या आत्मचरित्रातून हिंदुस्थानचे लोक लाचलुचपत करतात म्हणून त्यांना दोष दिला आहे. परंतु त्या बरोबरच लोकांत शिक्षणाचा प्रसार हळूहळू होऊन लोक राष्ट्रीय चारित्र्य संपादन करतील असेही सांगून ठेवले आहे. अशात.हेचे राष्ट्रीय चारित्र्य पाश्चिमात्य राष्ट्रांतून बरेच दृष्टीस पडते. एका रशियन किंवा अमेरिकन माणसाला आपल्या देशाचा मोठा अभिमान वाटतो. आपल्या लहानसहान कृत्याचा आपल्या राष्ट्राच्या प्रगतीवर परिणाम होईल याची त्याला जाणीव असते. आणि म्हणूनच तो सतत जागरूक राहतो.

या उलट आपणाकडे राष्ट्रीय चारित्र्याचा अजूनही अभाव आहे. त्यामुळेच लाचलुचपत बोकाळली आहे, प्रांतीयता वाढली आहे, जातीयतेला ऊत आला आहे, आणि व्देष मत्सर व हेवेदावे यांची भुतें थयथय नाचत आहेत. याचें प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे आसाम या प्रांतात जी जातीय दंगल झाली तिचे देता येण्या सारखे आहे. म्हणजे स्वातंत्र्यानंतर आपणा सर्वांची मनें राष्ट्रीय भावनेने भारली जाण्याऐवजी डबक्यातील किड्या प्रमाणें संकुचित व्हावीत ही गोष्ट घृणास्पद आहे. आपण अवलोकन केलेल्या आत्मचरित्रांच्याकडे पाहिले तर सामाजिक आणि राष्ट्रीय कार्य करण्यासाठी काहींनी पुष्कळ खस्ता खाल्या आहेत असें दिसून येते. या सर्व आत्मचरित्रकारांत महात्मा गांधींचें आत्मचरित्र सूर्याप्रमाणें सर्वांना मार्गदर्शन करणारे आहे. प्रत्यक्ष पारतंत्र्याच्या भोवऱ्यातून एवढ्या मोठ्या राष्ट्राची नौका स्वातंत्र्याच्या किनाऱ्यापर्यंत सुखरूप पोहोचवायची म्हणजे त्यांना कोण यातना झाल्या असतील हें त्यांचें त्यांनाच ठाऊक. त्याची थोडीशी कल्पना त्यांच्या आत्मचरित्रावरून येते.

तेव्हयावरूनही त्यांचा राष्ट्रीय बाणा दिसून येतो. हिंदुस्थान हें एक मोठे राष्ट्र आहे. या राष्ट्रात अनेक जाती आहेत. याबद्दल सुप्रसिद्ध लेखक के.एम.पणिक्कर म्हणतात (१) " इ.स. १९५७ मध्ये झालेल्या जनगणने प्रमाणें जवळ जवळ तीन हजार जाती हिंदुस्थानांत आहेत. प्रत्येक जात स्वतःला इतराहून श्रेष्ठ समजते आणि प्रत्येक जात इतर जातीपासून अलग राहण्याचा प्रयत्न करते. समाजामध्ये या जाती एकमेकांना सहाय्यभूत न होता उलट वैमनस्य मात्र वाढवतात." ही गोष्ट झाली नुसत्या जातींची. याशिवाय पुष्कळ पंथ आणि अनेक धर्म आहेत ते निराळेच. तशातच पुन्हा प्रांतीय भाषा आहेत. हिंदी ही जरी राज्य व्यवहाराची भाषा म्हणून घटनेप्रमाणें अधिष्ठित झाली आहे तरी दक्षिण हिंदुस्थानांत तिला होणारा विरोध दुर्लक्ष करण्यासारखा नाही. अशा अनेक मतामतांच्या कुजबुजाटात, प्रत्येक जात स्वतःच्याच पोळीवर तूप ओढण्या साठी आणि दुसऱ्याचे पाय मागे ओढण्यासाठी उत्सुक असतांना, इंग्रज राज्यकर्त्यांनी येथील लोकांत आपापसांत कलह निर्माण करून फूट पाडली असतांना, लोक अज्ञान आणि अंधश्रद्धा यांना चिकटून बसलेले असतांना म्हणजे सर्व बाजूंनी निराशा आणि संकटांच्या सह्याद्रीसारख्या रांगा उभ्या असतांना लोकमान्य टिळक आणि इतर थोर पुढाऱ्यांनी अशा परिस्थितीतूनच स्वातंत्र्याचा मार्ग काढला. याचें मुख्य कारण म्हणजे त्या सर्व पुढाऱ्यांच्या ठिकाणी राष्ट्रीय अभिमान सतत तेवत होता हें होय.

आजही हिंदुस्थानात सामाजिक आर्थिक आणि इतर सर्व बाबतींत नवविचारांची आणि सदाचाराची प्रेरणा करावयाची असेल तर सर्वांची मनें राष्ट्रीय भावनेनें भारली गेली पाहिजेत. जसे विचार तसे आचार ही म्हण रूढ आहे. तेव्हा

(1) ' Hindu Society At Cross Roads ' First Edition Jan.1955. Page 12 by Shri K.M.Panikkar.

आपल्या विचारांत राष्ट्रीय भावना असल्याशिवाय आपल्या हातून निःस्वार्थ बुद्धीने समाजाच्या कल्याणाचें कार्य घडणार नाही. आपण सर्वांनी आपापलें कर्तव्य निःस्वार्थ भावनेने, निष्ठेने आणि वेळेवर करायचे ठरविलें तरी कामाचा कितीतरी मोठा ढीग आपोआप उचलला जाईल. परंतु यासाठी आपण सर्वांनी कधीही केला नव्हता तो राष्ट्रीय विचार मनांत स्थिर केला पाहिजे. त्या शिवाय दुसरा मार्ग नाही. कारण राष्ट्रीय भावनेचा ओलावा अंतःकरणातून पाझरल्याशिवाय समतेची, सुखाची आणि शांततेची गंगा वाहू लागणार नाही. हा बोध आत्मचरित्रांच्या वाचनाने मिळण्यासारखा आहे.

## १०　माणुसकीचा महिमा

आता कोणी म्हणेल की आत्मचरित्रांच्या वाचनाने आणि मननाने राष्ट्रीय भावना उद्दीपित होणार असेल तर ती मोठी घातुक अशी गोष्ट आहे कारण राष्ट्रीय विचार आणि राष्ट्रीय आचार या गोष्टी आंतरराष्ट्रीय एकता निर्माण होण्याच्या विरुद्ध आहेत. तेव्हा असें सांगता येईल की ज्याला आपल्या वर अवलंबून असणाऱ्या कुटुंबातील माणसांचेंच संरक्षण करता येत नाही तो गावाचें किंवा प्रांताचें रक्षण कसें काय करणार ? ज्या हिंदूना हिंदूंचेंच संरक्षण आणि संघटन करता येत नाही ते इतरांचें रक्षण काय करणार ? जगाच्या पाठीवर जे अनेक धर्मांचे लोक आहेत त्यांत हिंदु धर्माचे लोकही आहेत. परंतु हिंदूंची आजची स्थिती ही मोठी केविलवाणी अशी आहे. त्यांना आपल्या घरांतच सुखाने राहणें मुष्किलीचें झालें आहे. याला अर्थात स्वत. आपणच जबाबदार आहोंत हे विसरून चालणार नाही.

या बाबतींत पुष्कळ आत्मचरित्रकारांनी मोठे मार्मिक विचार जागोजाग मांडलेले आहेत. त्या सर्वांच्या वरून घेता येण्याजोगा बोध या ठिकाणी संक्षेपाने सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचा सारांश हाच की आपल्या सर्व कृतींच्या

मुलांशी राष्ट्रीय भावना पाहिजे. आपण सर्वांनी माणुसकीने वागायला शिकले पाहिजे आणि बाकीच्या सर्व क्षुद्र विचारांना टाकून दिले पाहिजे.

याबाबत श्री. के.एम.पणिक्कर यांचे विचार मोठे मार्मिक आहेत. ते येथे मुद्दाम अगदी थोडक्यात सांगतो (१) " कारण आज हिंदु समाजाला एका मोठ्या कठिण परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे. अशी स्थिती पूर्वी कधीही निर्माण झाली नव्हती. आज आपलेंच राज्य स्थापन झालें आहे आणि हिंदुसमाजांत आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी सरकार उद्युक्तही झालें आहे. ही सुधारणेची लाट आतां थांबणार नाही. सुधारणा जरी कमीजास्त प्रमाणांत होत गेल्या तरी कायद्याचा पाठिंबा मिळाल्यामुळे त्या होणारच. कारण सुधारणा घडविण्यासाठी उत्सुक असलेले सरकार आणि जुन्या जीर्ण चालीरीती या एकत्र नांदणे शक्य नाही. या शिवाय आर्थिक समता स्थापण्याची जी लाट उसळली आहे ती पुढे पुढे आणखी आणखी सुधारणा घडवून आणीलच. कारण कायद्याचा पाठिंबा त्या सुधारणांना हमखास मिळणार. म्हणूनच यापुढे हिंदु समाजाची घडण एकजिनसी आणि सुसंघटित होत जाईल यांत काही शंका नाही. तसें झालें म्हणजे हिंदुसमाज जगांत पुन्हा आपलें गौरवाचें स्थान प्राप्त करून घेईल हें काय सांगायला पाहिजे ! "

---

(1) Hindu Society At Cross Roads - by Shri K.M.Panikkar. Page 101 & 102.

॥ ११ ॥

## ज्ञानदीप लावू घरोघरी

आधुनिक आत्मचरित्रांचें समीक्षण करण्याच्या निमित्तानें आता पर्यंत जो विचार या उपसंहारांत मांडला त्याला आधार म्हणून अनेक दाखले आणखी देता येण्यासारखे होते. परंतु त्यांची आवश्यकता नाही.

आता येथे एक शेवटचा मुद्दा मांडायचा तो असा की आज हिंदुस्थानांत लिहितावाचता येणाऱ्या लोकांची संख्या शेकडा पंधरा पेक्षा जास्त नाही. असें असतानाही हिंदुस्थानांतील लोकांनी स्वातंत्र्य मिळविण्यासाठी जो स्वार्थत्याग केला तो खरोखरच मोठा स्पृहणीय असा आहे. न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे, महात्मा ज्योतिबा गोविंदराव फुले, निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, समाज सुधारक गोपाळ गणेश आगरकर, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, आणि स्त्री शिक्षणाचे अध्वर्यु डॉक्टर धोंडो केशव उर्फ अण्णासाहेब कर्वे या आणि इतर अनेक थोर पुरुषांनी महाराष्ट्रांत आणि पर्यायाने हिंदुस्थानांत जें राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणेचे कार्य केले त्यामुळे समाजांत प्रगति झाली आहे आणि पुढेही होईल हें सूर्य प्रकाशा इतके स्पष्ट आहे. या थोर पुरुषांच्या पैकीं फारच थोड्यांनी आत्मचरित्रें लिहिली आहेत.

मराठी भाषेंत लिहिलेल्या आत्मचरित्रकारांच्या पैकीं कोणी राजकीय कार्य केलें आहे, कोणी सामाजिक कार्य केलें आहे, कोणी वाङ्मयीन कार्य केलें आहे, कोणी औद्योगिक कार्य केलें आहे, कोणी धार्मिक जागृती केली आहे तर कोणी कलेची पूजा करण्यात धन्यता मानली आहे. म्हणजे कोणी काही कोणी काही कार्य

करून समाजाला सुखी करण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व आत्मचरित्रांना धवळून निघालेले समाजोपयोगी विचार थोडक्यात या ठिकाणी मांडण्याचा मी प्रयत्न केलेला आहे.

शेवटी माझ्या मनात जो विचार आला तो असा की शिकल्या सवरलेल्यांचे प्रमाण शेकडा पंधराच्यावर नसतांना जर आपण हिंदुस्थानातील लोकांनी एवढी प्रगती केली तर शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होऊन शिक्षणाचे प्रमाण जर शंभर टक्यावर गेले म्हणजे समाजातले सारेच लोक सुशिक्षित झाले तर याहूनही अधिक प्रगती होणार नाही का ? पण तेवढयासाठी घराघरांतून ज्ञानदीप प्रज्वलित झाला पाहिजे. असा विचार आत्मचरित्रांच्या वाचनाने ध्वनित झालेला आहे. कारण ज्ञानाशिवाय मनुष्याचें जीवन फुकट आहे. उलट ज्ञान हेंच जीवनाचें सर्वस्व आहे अशी आपली दृढ भावना झाली पाहिजे. सर्वजण ज्ञानी झाले तर मानवजातीच्या कल्याणासाठी आपण कितीतरी कार्य करून दाखवूं की ज्याची आज आपणास कल्पनाही करता येणार नाही. तरी तशी बुध्दि आणि शक्ति परमेश्वर आपणा सर्वांना देवो आणि आपल्या हिंदु समाजाला मोठें उज्वल स्वरूप प्राप्त होऊन आपल्या हातून मानव जातीची अधिकाधिक सेवा घडो अशी त्या विठ्ठलाच्या चरणी नम्र प्रार्थना करून हा प्रबंध पूर्ण करतो.

+++++ *=*=*=*=* +++++